INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.428 (SJIF 2026)

# प्राचीन काळातील अंबरनाथ येथील शिवमंदिर

## (Ancient Shiva temple at Ambernath)

**डॉ. डापके शिवाजी आनंदा**

प्रभात कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
निधोना (महाराष्ट्र, भारत)
E-mail: Shivadapke05@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/09.2026-42263438/IRJHIS2609004**

**(1) प्रस्तावना :**

अंबरनाथ शहराचे भूषण आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेली प्राचीन शिव मंदिर म्हणजे स्थापत्य कला आहे. एक अद्भुत आणि अप्रतिम नमुना असल्याचे सांगितले जाते. त्याचप्रमाणे जागतिक दर्जाच्या वारसांमध्ये देखील या अंबरनाथ प्राचीन मंदिराची दखल घेतलेली आहे. हे प्राचीन शिवमंदिर पांडवकाळातील असल्याचे आपल्याला सांगितले जाते. प्राचीन काळमध्ये एक आखीहिका अशी सांगितली जाते, की त्यांच्या पूर्ण काळ या मंदिरामध्ये या मंदिराच्या वास्तव्यात गेलेला आपल्याला समजते. भारतात अनेक विविध मंदिरे आढळून येतात. बहुतांश मंदिरे आपणास प्राचीन काळातील असल्याचे दिसून येते तसेच या मंदिराची वैशिष्ट्ये एक आपल्याला सांगितले जातील की, मंदिरात किंवा भारतावर या मंदिरावरती बरेच परकीयांचे, विदेशी, आक्रमणे होताना आपल्याला दिसलेली आहेत. तरी पण तेथील जीवन हवामान, पर्यावरण, या सांस्कृतिक या गोष्टींचा प्रभाव देखील या मंदिरावरती पडलेला आहे. तरीपण ते मंदिर आज खऱ्या अर्थाने जसेच्या तसे आजही मोठ्या उमेदीने डोलणे उभी आपल्याला दिसते.

या मंदिराच्या दुसरे वैशिष्ट्य आपल्याला सांगता येईल की, या मंदिरावर छोटी छोटी देव देवतांची मूर्ती आजही जसेच्या तसे आपणाला या ठिकाणी पाहायला मिळतात. यामध्ये महत्त्वाचा इतिहास असे सांगता येईल की, या मंदिरावर बऱ्याच शैलीचा प्रभाव पडल्याचे आपणाला प्राचीन काळामध्ये दिसतो. या मंदिराविषयी सांगता येईल की बारा ज्योतिर्लिंग पैकी भारतामध्ये जी ज्योतिर्लिंगी आहेत, त्यामध्ये या ज्योतिर्लिंगाचा सर्वात प्राचीन असा इतिहास राहिला आहे. त्यापैकी एक ही मंदिर आहे. या मंदिरामध्ये मूर्ती देवदेवता चित्रे एका दगडात कोरलेली आपणास दिसून येते. तसेच आपणाला याही गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे की शिव आणि पार्वतीचे प्राचीन कालखंडामध्ये लग्न विवाह सोहळा झाला होता. त्याच्यामध्ये ती आख्यायिका आजही आपल्याला त्या ठिकाणी पुराव्या आधारे दिसून येते. तसेच मुंबई महाराष्ट्रातील नाही, तर देश प्रदेशातील पर्यटकांमध्ये या शिव मंदिराविषयी लोकप्रियता आजही जशी तशी आहे. या मंदिरातील दरवर्षीप्रमाणे जो हिंदू संस्कृतीमध्ये जो सण असतो.

महाशिवरात्रीच्या मध्ये श्रावणातील प्रत्येक सोमवारी या मंदिरात विशेष भाविक धार्मिक, आणि सांस्कृतिक, कार्यक्रमाचे आयोजन होत असते. याविषयी आपल्याला भाविकांचे आजही पुरावे त्या ठिकाणी या मंदिरात दिसते.

आपला भारत देशाचा इतिहास प्राचीन काळापासून राहिलेला आहे.तर असे अनेक मंदिरे या ठिकाणी प्राचीन काळात आपल्याला खोदलेली दिसतात. तर गुप्तकाळ असेल मौर्य काळ, असेल कुशन काळ, असेल किंवा राष्ट्रकुट काळ असेल अशा अनेक राजवटीमध्ये आपल्याला एकाच दगडांमध्ये कोरलेले अनेक मंदिरे आपल्याला पहावयास मिळतात. तसे उदाहरण पाहता कृष्णप्रथम राष्ट्रकूट राजा या राजांनी आपल्या संभाजीनगर शहरांमध्ये वेरूळची लेणी ही अशी उत्तम प्रकारे खोदलेली आहे. एक प्राचीन काळातला आपल्याला जवळीक उदाहरण सांगता येईल. अनेक मंदिर ही मुळापासून वरती असे खोदलेली आहे. परंतु या वेरूळ कैलास लेणीचा असा एक महत्त्व आहे की ती, एकाच दगडामध्ये वरून खाली खोदलेली आहे. एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. त्याचप्रमाणे प्राचीन कालखंडामध्ये अनेक गड किल्ले आपल्याला पहावयास मिळतात. तसेच मध्ययुगीन काळातील आधुनिक काळा असेल बऱ्याच राजांनी आपल्या राजवटीमध्ये किल्ले, गुफा, मंदिरे, कोरल्याचे आपल्याला इतिहासामध्ये पाहायला मिळतात.

**(2) शिव मंदिराचा इतिहास :**

भारतात अनेक मंदिरे आढळून येतात येथील बहुतांश मंदिरे अगदी प्राचीन असल्याचे दिसून येतात. या मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व अनन्यसाधारण अशीच आहे. भारतावर आजपर्यंत अनेक परकीय आक्रमणे झाली. परकीय आक्रमणाने भारतातील हजारो मंदिराचे नाव दूर केले अनेक आक्रमणे झेलूनही अनेक मंदिरे आताच्या घडीला अगदी डोलाने उभे आहेत. महाराष्ट्रालाही मोठी सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक, परंपरा आहेत तसेच महाराष्ट्रातही अनेक प्राचीन मंदिर आहेत. त्यामध्ये अतिशय सुप्रसिद्ध असलेले अंबरनाथ मंदिर म्हणजे आत्ताचे अंबरनाथ असे शिवमंदिर हे पांडवकालीन असलेले सांगितले जाते. अमरनाथ असे मंदिर या शहराचे व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या प्राचीन शिवमंदिर म्हणजेच स्थापत्य कलेचा एक अद्भुत व अप्रतिम नमुना, असल्याचे आपणास दिसते अकराव्या शतकात ही मंदिर बांधलेली आहेत.

**(3) अंबरनाथचे शिव मंदिर** :

महाराष्ट्रात तील अंबरनाथ मंदिरात भगवान शिव ची पूजा केली जाते. मंदिरात सापडलेले एका शिलालेखावरून शील राजा यांनी 1160 मध्ये बांधण्याचा पुरावा तेथे सापडला आहेत. तसेच ते पांडवशाहीचे वंशाची लोक असल्याचे स्थानिक सांगतात. हे ब्राझील मंदिर भूतकाळातील हिंदू शिल्पकलेचे अप्रतिम उदाहरण आहेत. अकराव्या शतकाच्या मध्यात बांधलेल्या अंबरनाथ मंदिर या जगात कुठेही पाहायला मिळणार नाही. या मंदिरामध्ये दोन नंदीबैल आहेत मंदिराच्या परिसरावर तीन मुख्य मंडप आहेत. गर्भग्रहाचे नऊ शरणाच्या खाली स्थित आहेत ते मंदिराचे मुख्य शिवलिंग त्रिमूर्तीची आहे. त्यांच्या गुडघ्यावर एक स्त्री आहे. जी शिवप्रतिची आकृती दर्शवते वरच्या भागात शिवाला निवृत्तीच्या मुद्रेत चित्रित केले आहे.

**(4) अंबरनाथ मंदिराविषयी पौराणिक कथा :**

अंबरनाथ यांचा उगम महाभारत काळापासून आहे. पौराणिक कथेनुसार पांडवांनी त्यांच्या वनवासातील सर्वात कठीण वर्ष अंबरनाथ येथे घालवली. जिथे त्यांनी ही जुनी मंदिर एका रात्रीत बांधली कौरवांचा त्यांना सतत पाठलाग होत असल्याने त्याला इथून

पळून जावे लागले. गर्भ ग्रहाच्या अगदी व वर असलेल्या गर्भगृहाच्या अनुपस्थित अगदी जी मंडपाच्या वीस पायऱ्याखाली आहेत आणि अवकाश स्वयंभू श्री लिंगाचे दर्शन होते. पांडवांनी वनवासात काही वर्ष घालवली परंतु स्वतःच्या धावपळीमुळे मंदिराचे बांधकाम अपूर्ण राहिली. वर्षानुवर्ष हवामानाचा सामना करणारी ही मंदिर आजही जशी तशी उभी आहेत. देशातील बारा ज्योतिर्लिंग पैकी हे एक मंदिर आहे या मंदिराभोवताची भिंत समोरचा सभा मंडप काल घाटात नष्ट झाला परंतु मूळ मंदिर अजूनही टिकून आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यावर शिव सिंह हत्ती यासारख्या सुरेखा आकृती कोरलेल्या आपणास दिसते. या मंदिरावर गरुडा सिंह विष्णू कपालधारी शिव शिवपार्वती विवाह सोहळा नटराज असे अप्रतिम मूर्ती येथे कोरलेले आढळतात.

**(5) समारोप :**

तसा इतिहास पाहिला आपल्या भारत देशाला प्राचीन कालखंडापासून प्राचीन मंदिराचा इतिहास आहे प्राचीन काळ सुवर्णकाळ समाजाला जातो. तसेच प्राचीन कालखंडामध्ये जी काही राजवटी होऊन गेले त्यांच्याही काळामध्ये महत्त्वपूर्ण असे मंदिर स्थापत्य कला विषयी आपल्याला सांगता येईल व आताच्या आधुनिक कालखंडामध्ये ही बऱ्याच प्रमाणामध्ये आपल्याला स्थापत्य कला असल्याचे दिसून येते.

**(6) संदर्भ ग्रंथ** :

(1) डॉ. मोरवंचीकर रा. श्री., प्राचीन भारत,

(2) कोसंबी डी.डी., प्राचीन भारत की सभ्यता और संस्कृति.

(3) मेंदळे अनंत मधुकर, प्राचीन भारतीय समाज आणि संस्कृती वाई ज्ञान प्रकाशन मंडळ.

(4) प्रा. देव पुजारी मो.ना., डॉ. कुलकर्णी श.रा., प्राचीन भारत व इतिहास, राष्ट्रीय नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

(5) प्रा.दीक्षित राजा, प्राचीन आणि मध्ययुगीन भारताचा इतिहास.पुणे निराली प्रकाशन.

(6) डॉ. माटे .श्री, प्राचीन कला भारती कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 1998.

(7) देगलूरकर, ढवळीकर आणि गायकवाड, प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती.

(8) मराठीकर म.न., प्राचीन भारताचा इतिहास.

IRJHIS